Vol 6 Issue 4 October 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 4 | October - 2016

GRT Golden Research Thoughts

# लोकसंगीत : पूनर्विलोकन

डॉ. सौ. अर्चना माधव अंभोरे
सहयोगी प्राध्यापक, श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.



**सारांश(Abstract):**
समाजात संगीताचे किती प्रकार अस्तित्वात आहेत ही गोष्ट त्या समाजाच्या सांस्कृतिक पातळीवर अवलंबून असते. ज्या समाजात निरक्षरादि अप्रगत संस्कृतीची लक्षणे दिसतात तेथे संस्कारित किंवा लोकसंगीत अशा दोन संगीत परंपरा दिसून येत नाहीत, तेथे आदिम संगीताची एकच धारा वाहतांना दिसून येते.
प्रस्तुत शोध निबंधात शास्त्रीयेतर अर्थात आदिम संगीत, नागर संगीत व लौकिक संगीताचे स्वरुपाचा शोध घेताला गेला आहे.

*बीज शब्द (Key Boards )* – लोकसंगीत, आदिम संगीत, नागर संगीत, लौकिक संगीत, लोकसंगीत लक्षणे, प्रकार, लोकवाद्ये.

**प्रस्तावना :**
भारतीय शास्त्रीय संगीताचे जसे ख्याल, धृपद, धमार, इ. प्रकार आहेत तसेच शास्त्रीयेतर संगीततही आहेत. अशा संगीत प्रकारांमध्ये आदिम संगीत, नागर संगीत, लौकिक संगीत इ. येतात.

आदिम संगीत

(१) कालिकदृष्ट्या पहिले उदा. प्रागैतिहासिक
(२) प्राथमिक स्वरुपाच्या संस्कृतीचे
(३) कोणत्याही संस्कृतीचे प्राथमिक
(४) तंत्र, रुप इ. संबंधी प्रगत नसलेले कोणतेही
(५) कोणत्याही कालखंडातले पहिले
(६) आद्य संस्कृतीशी कल्पनाबध्द असलेल्या गुणांचे

आदिम संगीताचे वरील सहा अर्थ वर दिलेले आहेत. ज्या निरक्षर लोकांच्या जीवनात लोकसंगीता शेजारीच संस्कारित, शिष्ट वा कला-संगीताची धारा वाहत नसते अशांचे संगीत ते आदिम संगीत होय. ज्या समाजात निरक्षरतादि अप्रगत संस्कृतीची लक्षणे दिसतात,

१) जेथे संस्कारित कला संगीत आणि लोकसंगीत अशा दोन संगीत परंपरा आढळत नाहीत, तर संगीताची एकच धारा वाहतांना दिसते, तिला आदिम संगीत असे म्हणून शकतो.
२) आदिम संगीत हे कला दृष्ट्या प्राथमिक असते.
३) सांस्कृतिक दृष्ट्या आदिम ठरलेल्या समाजाचे संगीत सांगीतिक दृष्ट्या, कलात्मक दृष्ट्या श्रेष्ठ असू शकते.
४) अप्रगत ठरलेल्या संस्कृतीच्या संगीताची प्रत ठरवतांना प्रगत संस्कृतीच्या संगीताची लक्षणेही त्यात दिसून येतात.

आदिम संगीताच्या आसपास वावरणारे, त्याच्या लक्षणांवर हक्क सांगणारे असे दुसरे दोन प्रकार म्हणजे नागर संगीत व लौकिक संगीत हे होत.

**नागर संगीत :**
अनेक भाषा बोलणारे लोक एकत्र राहणे, अनेक वंशांचे लोक आपापल्या सांगितिक संस्कारांनिशी एकत्र वावरणे ही व या सारखी वैशिष्ट्ये नागर संगीताची होत.
१) सर्व लोकांचे वंशगत संगीत लोकसंगीत निरनिराळे असूनही त्यांच्या समान संगीत बाह्य परिस्थितीमुळे समान सांगीतिक प्रतिकिया असू शकतात.
२)महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या चळवळी झाल्या त्यावेळी रचल्या वा गायल्या गेलेल्या बहुसंख्य मेळ्यांचा गीतांचा अंतर्भाव नागरी संगीतात होतो.
३)कीर्तनकार जेंव्हा सिनेगीताच्या चालीवर आपल्या गरजेनुसार पदे रचतो तेंव्हा त्यांचाही समावेश नागरी संगीतात करावा लागेल.

**लौकिक संगीत :**
लौकिक आणि नागरी संगीतातील सूक्ष्म फरक हाच की नागरी संगीतापासून प्रेरणा येऊन जेंव्हा व्यावसायिक संगीतकार त्याचे आणि कलासंगीत

परंपरेचे सामान्य जनतेस आवडेल व पचेल इतके मिश्रण करतो आणि मुख्यत: जनसंपर्क माध्यमांद्वारे त्याचा प्रचार प्रसार करतो. त्यास लौकिक संगीत म्हणता येईल.
लोकसंगीताची लक्षणे :

## Alexander Crap म्हणतो -

"The folk-song is a song i.e. a lyric poem with melody, which originated anonymously, among unlettered folk in times past and which remained in currency for a considerable time, as a rule for centuries."[1]

१)वाद्य संगीताचा अभाव लोकसंगीताच्या व्याख्येत आढळून येतो याचे कारण असे की वाद्यांचा लोकसंगीतात वापर मुख्यत्वे साथीसाठी होत असतो.
२)स्वतंत्र वाद्यवादनाला लोकसंगीतात स्थान नाही.
३)लोकसंगीतात वाद्यांचा वापर 'लय' या संगीतातील काल-अक्षावरील मोजमापासाठी होतो.
एकंदर - लोकसंगीताचे प्रकटीकरण केवळ ज्या प्रेरणांनी शक्य होते त्यांचे स्वरुप लक्षात घेता लोकसंगीतात करमणुकीला स्थान मिळणे अशक्य ठरते.
४)लोकसंगीतातील सामुहिकता अतिशय व्यापक स्वरुपाची असते.
अ)लोकांत जी गीते वा गीतखंडे अनादि कालापासून रुढ आहेत त्यात काट-छाट करुन, भर घालून पूनर्निमितीच असते.
ब) लोकगीतांचा विषय आशयातला अपरिहार्य सामाजिक संदर्भ व व्यक्तिगत सुखदु:खापलिकडे पोहोचणारा आवाका पाहिल्यास ही गीते मानवाच्या संस्कृतीच्या आरंभी पासून असणे स्वाभाविक आहे.
क)ज्या सांगीतिक गरजा पूर्ण करण्यासाठी लोक गीताचा जन्म झालेला असतो त्या गरजांत होणाऱ्या फरकाबरोबर लोकसंगीताचे स्वरुप बदलते.
५)लोकपरंपरेत गुरु-शिष्य मौखिक परंपरा आढळत नाही.
६)लोकसंगीतात अलिखित परंपरेचे महात्म्य आहे आणि ते असणे याचा अर्थ भोवतालच्या सांस्कृतिक जीवनातील नवनवीन चेतकांना पडसाद देण्याचे सामर्थ्यही त्यात असणे होय.
७)लोकसंगीत हे अनादि-अनंत असते.
८)लोकसंगीत विशिष्ट भूप्रदेश, त्याची नैसर्गिक वैयिष्टये यांच्याशी जखडलेले असते.
९)कुठलेही लोकसंगीत निसर्गाला जवळ असते.
१०)लोकसंगीत लोकांबरोबर स्थलांतर करु शकते. अर्थात एका संस्कृतीमधील संगीत दुसऱ्या संस्कृतीतही स्थलांतर करु शकते.

## लोकसंगीत आणि रागसंगीत :

डॉ. कुमार गंधर्व म्हणतात[२] -

अनुभव से इस निर्णय पर पहूँचा हूँ कि राग बनाए नही जाते, बनते है। हम लोकधुनों में रागों को छुपा पाते है..... लोक धुनों में कोई ना कोई राग अवश्य होता है। उस के लिये दृष्टि की आवश्यकता है............ अत: स्पष्ट है कि शास्त्रीय राग लोकधुनों में छिपे हुये रागों के विकसित स्वरूप होते है।

## देवीलाल सामर[३] -

'रागसंगीताचे मूळ लोकसंगीतातच आहे. मिश्र राग सुद्धा लोकसंगीतातच असतात. इतकेच नव्हे तर विवादी स्वरांचा उपयोग, रागांची मिश्रणे आणि लोकप्रियता या गोष्टी लोकसंगीतानेच शास्त्रीय संगीताला दिल्या आहेत.'

वरीलच नव्हे तर अनेक विद्वानांनी वरील प्रकारची मते दिलेली आहेत मात्र स्वरांचा समूह, वर्ज्यावर्ज्यादि नियम, वादी संवादी इ. घटकांनी बांधणी निश्चित व गुंतागुंतीची असणारी राग संकल्पना आणि नवनवीन स्वतंत्र रचना करण्याची राग स्वरुपात अंतर्भूत असलेली संकल्पना यातला भेद गुणदृष्ट्या फार मोठा आहे.[४]

एकूणच - लोकधूनांत राग असतो असे म्हणण्यापेक्षा त्यात राग दिसतो असे म्हणणे जास्त संयुक्तिक आहे.

## लोकगीतांचे सांगीतिक विश्लेषण :

लोकसंगीतातील गीतांचे पाठसंबध्द किंवा सांगीतिक विश्लेषण करणे सूक्ष्म रीतीने करणे अशक्य आहे. आपण पुढील कारणांचा विचार करुया.
१)धृवपदाची एकुलती एक ओळ इतर ओळींपेक्षा लांब असणे स्वाभाविक आहे.
२)बहुतांशी कडवे छोटे असण्याकडे लोकगीतांची प्रवृत्ती असते.
३)ओळ, कडवे, धृवपद या गीताच्या पाठबद्ध अंगाबरोबर छंदाचा विचार केल्यास छंदातील संगीततत्वाचा आढळ ही एक सर्वमान्य अनुभूती आहे.
४)अर्थहीन शब्द अथवा अक्षरसमूह यांचा लोकगीतांतील वापर हा पाठबद्ध विश्लेषणात येतो.
५)पाठबद्ध रचनेचा विशेष सांगीतिक भाग म्हणजे कांही गीतांत होत जाणारी कडव्यांची वाढ.
६)लोकगीतेही लोककवितेचाच एक भाग असतो.

## सांगीतिक विश्लेषण :

ॲलन लोमॅक्स, अमेरिकन लोकसंगीत शास्त्रज्ञ, फोक साँग्स, स्टाईल ॲन्ड कल्चर या पुस्तकात त्याने लोकगीताची तपासणी करतांनी ३७ अंगे तपासावीत असे म्हणतो.[५]
१)गायक - समूह
२)साथीचा वाद्यवृंद आणि गायन यांचे नाते.
३)वाद्यवृंद
४)गाणाऱ्या आवाजांची मूलभूत रचना
५)गाणाऱ्यांचे एकमेकांशी मिसळून गाणे.
६)लयीच्या बाबतीत गायकांचे एक साथ असणे किंवा नसणे.
७)वाद्यवृंदाकडे सोपविलेल्या सांगीतिक कामगिरीचे स्वरुप.
८)वाद्यवृंदाचा एकमेकांशी मेळ नसणे किंवा असणे.
९)लयीबाबत वाद्यवृंदाचा मेळ असणे किंवा नसणे.
१०)सार्थ शब्दांचे निरर्थक शब्दांशी नाते.

११)गाणाऱ्यांची लयी बाबत पद्धत असणे.
१२)गायकांचे लयीविषयीचे अतर्गत संबंध
१३)साथ संगीताची लयीबाबत बांधणी
१४)साथ संगत करणाऱ्या समूहाबाबत लयी संबंधीची अंतर्गत बांधणी.
१५)चालीचा आकार
१६)चालीचे रुप
१७)सांगीतिक तुकड्यांची लांबी.
१८)सांगीतिक तुकड्यांची संख्या.
१९)शेवटच्या स्वराचे स्थान
२०)गीतातील स्वरांतरांतील अंतर
२१)बहुआवाजी गायन
२२)गीताचा सांगीतिक पल्ला
२३)गायकांनी गायनात वापरलेल्या अलंकरणाचे प्रमाण
२४)गती
२५)गाज (लहान-मोठेपणा)
२६)लयीपासून गायकांनी घेतलेले स्वातंत्र्य
२७)आवाजाचे एका स्वरावरुन दुसऱ्याकडे जातांनाचे घसरणे
२८)लयीपासून वादकांनी घेतलेले स्वातंत्र्य
२९)एकेका अक्षराला अनेक स्वरांतरांचा उपयोग करणे.
३०)आवाजातील कंप
३१)आवाजातील गमक, कंठमणी हलवून निर्माण केलेला जोरकस कंप
३२)आवाजातील रजिस्टर्सचा उपयोग
३३)वापरल्याजाणाऱ्या आवाज लावण्याच्या पद्धतींचा पल्ला
३४)नाकातून गाणे
३५)घोगरा आवाज
३६)स्वरावरील आघात
३७)व्यंजनाचे उच्चार.

लोमेक्स इतकी तपशीलवार पध्दत कुणीही मांडलेली नसली तरी ब्रुनो नेटल ने देखील काही प्रश्न उभे केलेले आहेत. दोन्ही पद्धतीपैकी संपूर्णपणे एकच पद्धत स्वीकारता येईल असे नाही. पण दोहींचा वापर करुन लोक गीताचे विश्लेषण निश्चितच शक्य आहे.

*लोकसंगीतातील वाद्ये :*

एकंदर वाद्ये किती व त्यांतील लोकवाद्ये किती याची निर्णायक गणती अजून केलेली नाही.

वाद्य वर्गीकरणाच्या पद्धती

(१) वाद्य कशाचे बनविले जाते.

(२) संगीत शैलीवर आधारलेली पद्धती

(३) विशिष्ट वाद्याच्या ध्वनीनिर्मितीत कोणते ध्वनिशास्त्रीय तत्व कार्यकारी झालेले तत्व

महाराष्ट्रातील लोकवाद्ये

१) भरतप्रणित वर्ग - घन

- अ) चिपळ्या, टिपऱ्या, मंजिरी, टाळ, चकवा, झांज, कासाळे, लेजीम
- ब) घंटी
- क) घुंगरु, खुळखुळे
- ड) मोरचंग

२) अवनद्ध - (कंपित पटल) वाद्ये
भरतप्रणित वर्ग - अवनद्ध

- अ) डमरु
- ब) खंजिरी, डफ, चंग, डफरी किंवा दिमडी, रणहलगी
- क) घुमट
- ड) ताशा, नगारा, टिमकी, चौघडा
- इ) ढोलाच्या आकाराचे ढोलक, नाल, समेळ/संबळ, खोळ
- फ) चोळण किंवा चोंडके
- ग) डेरा

३) सुषिर : कंपितवायुस्तंभ वाद्ये
भरतप्रणित वर्ग - सुषिर

- (अ) शिंग, शंख
- (ब) शृंग
- (क) अलगूज, बसरी
- (ड) मुरली
- (इ) पुंगी, तारपी
- (फ) सनई, सुंदरी

४) तंत्री, तत् वाद्ये -
भरत प्रणित वर्ग तत्

- (अ)
- (ब)
- (क)
- (ड)
- (इ)

**निष्कर्ष :**

१) गजाने वाजणारी वाद्ये महाराष्ट्रात नाहीत.
२) पडद्यांची वाद्ये देखील महाराष्ट्रात नाहीत.
३) पडद्यांशिवाय वाद्ये महाराष्टात नाहीत.




*उपसंहार :*

लोकसंगीत म्हणजे काय? त्याची लक्षणे कोणती? प्रकार कोणते? लोकसंगीतातील वाद्ये कोणती, शिष्ट संगीत लोकसंगीतातील परस्पर संबंध इ. चा शोध घेता पुढील निष्कर्ष समोर येतात.

१)जगाची २ प्रकारे विभागणी झालेली आहे.
१) भौगोलिक २) सांस्कृतिक. या विभागणीचा मुळीच अडथळा लोकसंगीतास होत नाही.
२)कित्येक शतकांत दळणवळण नसूनही लोकसंगीताच्या गायन शैलीत साम्य आढळते.
३)लोकसंगीताचा सर्वांगीण अभ्यास केल्याने केवळ लोकसंगीतच समजते असे नव्हे तर संबंधित लोकसंगीताला पोसणारे लोकजीवन समजते.
४)गायन शैलींच्या अभ्यासात लयबद्ध रचना, त्यांचे अर्थपूर्ण प्रयोग, त्यांचा अन्वय नेमकेपणे लावणे हे काम लोकसंगीताच्या संदर्भात अवघड आहे.
५)लोकसंगीताचा प्रवाह, त्याचे अपरिमित स्वरुप, वैविध्य, शास्त्रीय संगीतास प्रेरणादायिनी शक्ती आहेत.
६)लोकवाद्यांच्या संदर्भात आपण निश्चित असे म्हणू शकतो की, शास्त्रीय वाद्यांचे ते अविकसित रूप आहे.
७)शास्त्रीय संगीतात वाद्यांचा विकास लोकवाद्यांद्वारे झालेला आहे.
८)शास्त्रीय संगीताचे जसे ख्याल, धृपद-धमार इ. प्रकार आहेत, त्या - त्या प्रत्येकाची स्वत:ची स्वरुप - वैशिष्ट्ये आहेत, तसाच प्रकार शास्त्रीयेतर संगीतात आढळून येतो.

*संदर्भ :*

१)Crap, Alexander, The Science of Folk-lore, Page - 153
२)'कुमार गंधर्व, (जानेवारी १९६६), भारतीय संगीत का मुलाधार लोकसंगीत, संगीत, लोकसंगीत अंक, पृ. २५.
३)सामर, देवीलाल, लोकसंगीतशास्त्र, पृ. ३४.
४)रानडे, अशोक (१९७५) लोकसंगीत शास्त्र पृ. ३६.
५)तत्रैव पृ. ५०

*संदर्भ ग्रंथ :*

१)रानडे, अशोक (१९७५), लोकसंगीत शास्त्र, दि. भारत मुद्रक अँड प्रकाशक लिमिटेड, औरंगाबाद.
२)देवगांवकर, शैलजा (१९९३), महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३)पांडे प्रभाकर (१९९४), लोकरंगभूमी, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.
४)जोहरी सीमा (२००४), भारतीय संगीत, मैसर्स युनिव्हर्सिटी बुक हाऊस (प्रा.) लि. जयपुर -०३.
५)संगीत अंक, लोकसंगीत विशेषांक (१९६६), संगीत कार्यालय, हाथरस.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org